**146 ओवळा माजीवडा विधानसभा मतदार संघ, भाईंदर (प.),**
**महामानव शिव शाहु फुले आंबेडकर स्मृती सभागृह,बेथनी**
**हॉस्पीटलच्या बाजुला पोखरण रोड न.02 ठाणे(प) 400606**
**EMAIL ID : 146election2024@gmail.com**

**जा.क्र./निवडणुक/कावि-16/2024-25** **दि. 11//11/2024**

# // प्रसिध्दी पत्रक //

आज दिनांक 11/11/2024 सोमवार रोजी 146 ओवळा माजीवडा विधानसभा मतदार संघात मतदान जास्तीत जास्त होण्यासाठी मतदारांमध्ये (Sveep) जनजागृती करण्याबाबत आवाहन करण्यात आले. सदर कार्यक्रम हा ध्वनिक्षेपकाव्दारे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात फिरविण्यात आली व भारत निवडणुक आयोगा मार्फत आपले मतदार यादीतील नाव व मतदान केंद्र येथे शोधा किंवा 1950 या टोल फ्री क्रमांकावर संपर्क करून मतदार यादीतील नाव व मतदान केंद्राबाबत माहीती उपलब्ध करणे बाबत मिरा भाईंदर क्षेत्रात जास्तीत जास्त मतदान करणे बाबत क्युआर कोड वाले विनायल स्टिकर व रिक्षा व्दारे नागरीकांमध्ये व मोठ मोठया गृहनिर्माण संस्थामध्ये जनजागृती करण्यात आली तसेच स्थानीक नागरीकांमध्ये (आई,वडील,भाउ,बहीण,मित्र व शेजारी) मतदान करण्यास प्रोत्साहीत करावे असे आवाहान केले.

146 ओवळा माजीवडा विधानसभा मतदार संघात मिरा भाईंदर महानगर पालिका क्षेत्रात दि. 11/11/2024 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मोठ मोठया परिसरातील गृहनिर्माण संस्था व भाईंदर पुर्व येथील घोडबंदर गांव, काशीगांव येथे घरोघरी क्युआर कोड वाले विनायल स्टिकर लावुन स्वीप (sveep) अंतर्गत जनजागृती करण्यात आली. सदर गृहनिर्माण संस्थेतत काम करणारे कामगार व स्थानीक रहीवाशी बऱ्याच संख्येने उपलब्ध होत्या. त्यांना मतदान जनजागृती करण्याबाबत आवाहन करण्यात आले. ध्वनीक्षेपका व्दारे रिक्षा व क्युआर कोड वाले विनायल स्टिकर लावुन नागरीकां सोबत मतदार करणार असे फोटो काढुन जनजागृती करण्यात आली. तसेच उपस्थीत सर्व नागरीकांना मतदान करण्याबाबत आवाहन करण्यात आले. राज्य निवडणुक आयोगाने आपणास ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत त्याचा लाभ घ्यावा काही अडचण असल्यास नजीकच्या प्रभाग कार्यालयाशी संपर्क साधावा अशी माहिती दिली.

146 ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघाचे सहा.आयुक्त मि.भा.मनपा तथा नोडल अधिकारी, सुनील यादव, स्वीप पथक प्रमुख, श्री.कैलास शेवंत व स्वीप पथकातील कर्मचारी यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप पथकातील कर्मचाऱ्यांच्या मार्फत सदरचा कार्यक्रम घेण्यात आला.

दि. 20/11/2024 बुधवार या दिवशी सर्वांनी जास्तीत जास्त मतदान करावे व मतदार जनजागृतीच्या राष्ट्रीय कार्यक्रमास सहकार्य केल्याबददल 146 ओवळा माजिवडा विधान सभा मतदार संघातील स्वीप (sveep) पथकाने उपस्थीत गृहनिर्माण संस्थेतील कामगार व स्थानीक रहीवाशी यांचे आभार मानले.